मार्गदर्शन

# उन्हाळी भाजीपाल्याचे पीक घेताना योग्य नियोजन गरजेचे



**शक्तीकुमार तायडे**
(मो.नं. ७३८७७२५९२६)
**डॉ. मधुकर भालेकर**
उद्यानविद्या विभाग,
महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी,
जि. अहमदनगर







उन्हाळी हंगामात पाणी मर्यादित स्वरुपात असते, त्यामुळे या हंगामात भाज्यांची लागवड करताना पाण्याचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे. पाण्याचा कमी वापर करायचा असल्यास मल्चिंगच्या सहाय्याने भाज्यांची लागवड करणे फायद्याचे ठरू शकते. उन्हाळी हंगामात प्रामुख्याने भेंडी, गवार, टोमॅटो, वांगी, मिरची, काकडी, दोडका, घोसाळी, कारली, दुधी भोपळा, तोंडली, तांबडा भोपळा, चवळी, घेवडा, कोथिंबीर, कांदापात, मेथी आणि राजगिरा अशा विविध भाजीपाल्याचे उत्पादन घेतले जाते.

हंगाम कुठलाही असो, भाजीपाल्याला मागणी नेहमीच असते. महाराष्ट्राच्या विविध भागात निरनिराळ्या पद्धतीच्या भाज्यांची लागवड केली जाते. भाजीपाला लागवडीचे मुख्यत: तीन हंगाम आहेत. उन्हाळी, पावसाळी (खरीप) आणि हिवाळी (रब्बी). उन्हाळी हंगामात पाणी मर्यादित स्वरुपात असते, त्यामुळे या हंगामात भाज्यांची लागवड करताना पाण्याचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे. पाण्याचा कमी वापर करायचा असल्यास मल्चिंगच्या सहाय्याने भाज्यांची लागवड करणे फायद्याचे ठरू शकते. उन्हाळी हंगामात प्रामुख्याने भेंडी, गवार, टोमॅटो, वांगी, मिरची, काकडी, दोडका, घोसाळी, कारली, दुधी भोपळा, तोंडली, तांबडा भोपळा, चवळी, घेवडा, कोथिंबीर, कांदापात, मेथी आणि राजगिरा अशा विविध भाजीपाल्याचे उत्पादन घेतले जाते.

**जमिनीची निवड** : उन्हाळ्यामध्ये पाण्याची काही प्रमाणात कमतरता असते. अशा वेळी सुपीक जमीन निवडणे गरजेचे आहे. ज्या जमिनीत अधिक सेंद्रिय कर्ब व पाणी साठवून ठेवण्याची क्षमता अधिक आहे अशी जमीन उन्हाळी भाजीपाल्याच्या लागवडीसाठी निवडावी.

**लागवड करताना घ्यायची काळजी** : उत्तम पाण्याचा निचरा होणाऱ्या सुपीक जमिनीची निवड करावी व त्याचप्रमाणे रोग व कीड यास प्रतिकार करणाऱ्या आणि चांगले दर्जेदार उत्पादन देणाऱ्या जातींची निवड करावी. याबरोबरच उन्हाळ्यातील कोरडे हवामान आणि वाहणारे उष्ण वारे यापासून भाजीपाल्याच्या संरक्षणासाठी शेताच्या चारही बाजूंनी पिकाची दाट लागवड करावी. पाण्याची कमतरता लक्षात घेऊन ठिबक सिंचन, फवारणी तसेच मल्चिंग पेपर यांचा वापर महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. खतांचा वापर करताना रासायनिक व सेंद्रिय खतांचे योग्य संतुलन साधावे. फुलोऱ्या दरम्यान संजीवकांचा वापर करून, रोपवाटिकेपासून ते फळधारणा होईपर्यंत रोग व किडींच्या संरक्षणासाठी जैविक व रासायनिक औषधांचे नियोजन करावे. विशेषत: फुलोरा ते फळकाढणीच्या काळात एकसारखा पाणीपुरवठा आणि तो सुद्धा सकाळी आणि संध्याकाळी व रात्रीच्या वेळी (भर उन्हात पाणी देणे टाळावे). फळांची काढणी शक्यतो संध्याकाळी करावी.

**भेंडी व गवार** : भाजीपाला पिकांची उन्हाळी हंगामात लागवड करताना पिकानुसार काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. उन्हाळ्यात भेंडी व गवार या महत्त्वाच्या भाज्या घेतल्या जातात. त्यांना मागणीसुद्धा भरपूर असते. भेंडीची लागवड करताना हळद्या रोगास प्रतिकारक्षम वाणांची निवड करावी तसेच गवारीची लागवड करताना भुरी रोगास प्रतिकारक्षम व भरपूर उत्पादन देणारी जात निवडावी. भेंडी व गवार पिकांसाठी शेणखत व वरखतांच्या मात्र वेळीच द्याव्यात व या पिकांना मातीची भर द्यावी. उन्हाळ्याच्या



दिवसात या पिकांना पाणी वेळेवर द्यावे. तोडणी करताना ठरावीक वेळेवर एक दिवसाआड पिकांची तोडणी करावी, जेणेकरून बाजारात विक्रीसाठी माल नेताना सोयीस्कर ठरेल.

**मिरची, वांगी, टोमॅटो** : मिरची, वांगी, टोमॅटो यासारख्या पिकांची लागवड गादी वाफ्यावर करावी. डिसेंबर किंवा जानेवारी महिन्यात गादीवाफ्यावर बियाणे पेरून झाल्यानंतर साधारणपणे जानेवारी- फेब्रुवारी महिन्यात



रोपांची लागवड करावी. परंतु ज्या भागात कडक उन्हाळा व पाण्याची कमतरता असेल तर तेथे डिसेंबर महिन्यात बियाणे पेरून जानेवारीत रोपांची लागवड करावी. या पिकांमध्ये विषाणुजन्य रोगांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आवश्यक त्या औषधांची फवारणी रोपवाटिकेपासून फळधारणेपर्यंत नियमित अंतराने करावी. रोप लागवडीनंतर खतांचा वापर करून पाणी व्यवस्थापनाबाबत चांगली काळजी घ्यावी. जुनी किंवा कुजलेली पाने काढावीत. गरजेनुसार खते द्यावीत तसेच आवश्यकेतनुसार मातीचा भर द्यावा. टोमॅटो पिकासाठी वाण निवडताना प्रामुख्याने तो वाण अधिक पाने असणारा, उष्ण तापमानात फळधारणा होणारा, बोकड्या रोगास सहनशील व फळांना तडे न जाणारा निवडावा म्हणजे अपेक्षित उत्पादन मिळू शकते. टोमॅटोची लागवड शक्यतो लवकर करावी. कारण उष्ण हवामानात फळधारणा कमी होते. मिरचीसाठी वाण हा उंच शाखीय वाढ असणारा, फांद्या जास्त असणारा, पोपटी ते गर्द हिरव्या रंगाच्या लांब मिरच्या असणारा असावा. मिरचीमध्ये फुले ज्योती या जातीमध्ये मिरच्या झुपक्यात येतात व झाडावर दाट पाने असतात. वांगी या पिकासाठी उंच व डेरेदार वाढ असणारा काटेरी देठ, जांभळ्या, पांढऱ्या व हिरव्या रंगाची छटा एकत्र असणाऱ्या चकाकीदार गोल किंवा उभट गोल फळे येणाऱ्या वाणाची निवड करावी. वांगी पिकाच्या अधिक उत्पादनाकरिता शेणखत व रासायनिक खते यांचा संतुलित वापर करावा तसेच फुले अथवा फळगळ कमी करण्यासाठी १० किंवा २० पी.पी.म. तीव्रतेच्या एन.ए.ए. या संजीवकाच्या १ किंवा २ फवारण्या कराव्यात.

**वेलवर्गीय भाज्या** : वेलवर्गीय भाज्यांमध्ये प्रामुख्याने काकडी, कारली, दुधी भोपळा, दोडका व घोसाळी या प्रमुख भाज्यांचा समावेश आहे. या सर्व भाज्यांची लागवड बियांद्वारे व रुंद अंतर ठेवून केली जाते. लागवडीनंतर बियांची उगवण झाल्यानंतर काही दिवसांनी वेलीला वळण देणे व आधार देणे ही कामे फारच महत्त्वाची आहेत. दर्जेदार आणि चांगल्या गुणवत्तेचे उत्पादन मिळण्याकरिता वेलाला मंडप किंवा तारेच्या ताटीचा आधार देता येऊ शकतो. वेलवर्गीय भाज्यांमध्ये कारली, दुधी भोपळा, दोडका, घोसाळी ही कमकुवत वेलवर्गात मोडणारी पिके आहेत. वेलींना जर चांगला आधार मिळाला तर त्यांची वाढ चांगली होते. नवीन फुटीला सतत चांगला वाव राहतो आणि त्यामुळे फळधारणा चांगली होते. याउलट जमिनीवर पहिले काही मर्यादित फुटवे आल्यानंतर नवीन फुटवे येत नाहीत आणि वेली केवळ एकदा- दोनदाच फळे देतात. मंडपावर वेली ६ ते ७ महिने चांगल्या राहतात तर जमिनीवर लवकरच खराब होतात किंवा जास्त काळ टिकत नाहीत.

वेलवर्गीय भाज्यांना मंडप किंवा ताटी पद्धत वापरल्यामुळे फळे जमिनीपासून ४ ते ६ फूट उंचीवर वाढतात. फळे लोंबकळती राहिल्यामुळे त्यांची वाढ सरळ होते. हवा आणि सूर्यप्रकाश सारखा मिळाल्यामुळे फळांचा रंग सारखा आणि चांगला राहतो. फळांची तोडणी, औषध फवारणी ही कामे सुलभ होतात. दुधी भोपळा मंडपावर घेतल्यास जमिनीवर घेतलेल्या पिकापेक्षा उत्पादनामध्ये अडीच ते तीन पट वाढ होते. मंडप पद्धतीमुळे औषध फवारणी चांगल्याप्रकारे करता येते. कारली, दोडका व घोसाळी या पिकांना ताटी पद्धत वापरणे सोयीस्कर असते. वेलवर्गीय पिकांना वेळच्या वेळी पाणी द्यावे. वेलांना वळण व आधार दिल्यानंतर पिकास मातीची भर द्यावी व गरजेप्रमाणे खत द्यावे.

अशा प्रकारे उन्हाळी हंगामात भाजीपाला पिकांची उदा. मिरची, वांगी, टोमॅटो, भेंडी, गवार, कारली, काकडी, दुधी भोपळा, दोडका, घोसाळी, पालेभाज्या इत्यादी उन्हाळी भाज्यांची योग्य प्रकारे काळजी घेऊन वेळच्या वेळी सर्व बाबी केल्यास उत्पादनामध्ये चांगली वाढ होते. परिणामी बाजारभाव चांगला मिळून शेतकरी बांधवांना उन्हाळी भाजीपाला पिकांपासून चांगला फायदा होऊ शकतो.





## विविध उन्हाळी भाजीपाला पिकांसाठी लागवडीचा तपशील

| अ. क्र | पिकाचे नाव | जाती | बियाणे प्रतिहेक्टर | लागवडीचे अंतर | खतांच्या मात्रा | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | शेणखत/ टन/हे.(कि./हे.) | नत्र:स्फुरद:पालाश |
| १ | टोमॅटो | फुले राजा, धनश्री, भाग्यश्री, पुसा रुबी, रोमा, एस-१६० | सरळ जातीसाठी - ३०० ते ४०० ग्रॅम संकरित जातीसाठी- १२५ ग्रॅम | ७५x३० सें.मी . किंवा ९०x३० सें.मी. | २० ते २५ | सरळ जातीसाठी- २००:१००:१०० संकरित जातीसाठी- ३००:१५०:१५० |
| २ | वांगी | सुधारित जाती- अरुणा, रुचिरा, प्रगती, मांजरी गोटा, फुले हरिता, संकरित जाती- फुले कृष्णा, फुले अर्जुन, | सुधारित जातीसाठी- ४०० ते ०० ग्रॅम संकरित जातीसाठी- १२० ते १५० ग्रॅम | सुधारित जातीसाठी ७५x७५ सें.मी संकरित जातीसाठी- १२०x९० सें.मी. | २० ते २५ | सुधारित जातीसाठी- १५०:७५:७५ संकरित जातीसाठी- ३००:१००:१०० |
| ३ | मिरची | फुले ज्योती, फुले मुक्ता,ज्वाला, पंत सी-१, जी-४, जयंती. | सुधारित जातीसाठी १.० ते १.५ किलो संकरित जातीसाठी- ३०० ग्रॅम | ६०x४५ सें.मी. किंवा ६०x६० | २० ते २५ | सुधारित जातीसाठी- १००:५०:५० संकरित जातीसाठी- २००:१००:१०० |
| ४ | भेंडी | फुले उत्कर्षा, फुले विमुक्ता, अर्का अनामिका, अकोला बहार, परभणी क्रांती, नं. ३३३ (तन्वी), नं.९३३ (तर्जनी) | सुधारित जातीसाठी १२ ते १५ किलो संकरित जातीसाठी- ५ ते ७.५ किलो | ३०x१५ सें.मी. | २० ते २५ | सुधारित जातीसाठी- १००:५०:५० संकरित जातीसाठी- २००:१००:१०० |
| ५ | काकडी | फुले हिमांगी, फुले शुभांगी, हिरकणी, पुसा संयोग, श्वेता -२ | सुधारित जातीसाठी- २.० ते २.५ किलो संकरित जातीसाठी- १.० ते १.५ किलो | १.०x०.५० मीटर | २० ते २५ | सुधारित जातीसाठी- १००:५०:५० संकरित जातीसाठी- २००:१००:१०० |
| ६ | कारली | फुले ग्रीन गोल्ड, हिरकणी, कोकणतारा, कोइम्बतूर-१ | सुधारित जातीसाठी- २.० ते २.५ किलो संकरित जातीसाठी- १.० ते १.५ किलो | १.५x१ मीटर | २० ते २५ | सुधारित जातीसाठी- १००:५०:५० संकरित जातीसाठी- २००:१००:१०० |
| ७ | दुधी भोपळा | सम्राट, पुसा नवीन, अर्का बहार, नं. ८१० (ईश्वर) | सुधारित जातीसाठी- २.० ते २.५ किलो संकरित जातीसाठी- १.० ते १.५ किलो | ३x१ मी. ताटीसाठी आणि ५x१ मी. जमिनीवर | २० ते २५ | सुधारित जातीसाठी- १००:५०:५० संकरित जातीसाठी- २००:१००:१०० |
| ८ | दोडका | पुसा नसदार, कोकण हरिता, | २ ते २.५ किलो | १.५x१ मीटर | २० ते २५ | १००:५०:५० |
| ९ | घोसाळी | फुले प्राजक्ता, पुसा चिकणी, | २.५ ते ३ किलो | १.५x१ मीटर १.५x०.६० मीटर | २० ते २५ | १००:५०:५० |